# मंत्रिमंडळ निर्णय

१३ जून २०१७

( बैठक क्र. १३४ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | शासकीय जमिनींवरील जिमखान्यांच्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणाचे धोरण मंजूर | महसूल |
| २ | प्रादेशिक योजनांमधील अकृषिक जमिनींचे व्यवहार दंड आकारून नियमित करण्यासाठी सुधारणा | महसूल |
| ३ | नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या सामंजस्य करारासह पुणे मेट्रोच्या टप्पा एकच्या अंमलबजावणीस मंजुरी | नगर विकास |
| ४ | भीमा साखर कारखान्याच्या कर्जास राज्य शासनाच्या हमीस मान्यता | सहकार |

# शासकीय जमिनींवरील जिमखान्यांच्या भाडेपट्टयांच्या नूतनीकरणाचे धोरण मंजूर

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांसह राज्यातील अनेक जिल्ह्यांत जिमखान्यांना शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात आल्या आहेत. भाडेपट्ट्याची मुदत संपलेल्या जिमखान्यांच्या भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणाचे सुधारित धोरण आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आले. सुधारित धोरणानुसार जिमखान्यांना देण्यात आलेल्या जमिनीच्या क्षेत्राच्या आधारावर त्यांचे वर्गीकरण करण्यात आले असून त्यानुसार भाड्याची आकारणी करण्यात येणार आहे.

यापूर्वी राज्य सरकारने २००३ मध्ये मुंबईतील जिमखान्यांच्या संपुष्टात आलेल्या भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करण्याचे धोरण निश्चित केले होते. मात्र, त्यास काही जिमखान्यांकडून उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सुधारित धोरण तयार करण्यात आले असून त्यास आज मंजुरी देण्यात आली. बृहन्मुंबईसह राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये शासकीय जमिनीवर असलेल्या जिमखान्यांचे वर्गीकरण त्यांना भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या आधारावर करण्यात आले आहे. त्यानुसार २० हजार चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रावरील जिमखाना “अ” वर्ग, १० हजार चौ.मी. ते २० हजार चौ.मी. क्षेत्रावरील जिमखाना “ब” वर्ग तर १० हजार चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रावरील जिमखाना “क” वर्ग म्हणून निश्चित करण्यात आले आहेत.

जिमखान्यांच्या भाडेपट्ट्यांचे मानीव नूतनीकरण हे भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत जुन्या दराने भाडे वसूल करुन करण्यात यावे. मात्र, थकित भूईभाड्यावर व्याज आकारण्यात येणार नाही. आज झालेल्या निर्णयानुसार १ जानेवारी २०१७ पासून यापुढे वार्षिक भाडे आकारण्यात येणार आहे. जिमखान्यांना दिलेल्या शासकीय जमिनीच्या भाडेपट्ट्याचे ३० वर्षांसाठी नूतनीकरण करताना अशा जिमखान्यांना भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय जमिनींचे भाडे हे वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार (रेडीरेकनर) असलेल्या जमिनीच्या किंमतीच्या १० टक्के रक्कमेवर आकारण्यात येणार आहे. मात्र, जिमखान्याच्या वर्गवारीनुसार हे दर वेगवेगळे असणार आहेत. अ वर्ग जिमखान्यांसाठी या रक्कमेच्या एक टक्के दराने, ब वर्ग जिमखान्यासाठी ०.५० टक्के दराने व क वर्ग जिमखान्यांसाठी ०.२५ टक्के इतक्या दराने आकारले जाईल. जिमखान्यांच्या वार्षिक भाड्यात दरवर्षी चार टक्के इतकी वाढ करण्यात येणार आहे.

जिमखान्यांना देण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर नव्याने बांधकाम करण्यासह अस्तित्वातील बांधकामांचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाची परवानगी गरजेची आहे. जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर संबंधित जिल्हाधिकारी पदसिद्ध सभासद असतील. क्रीडा प्रयोजनाशिवाय इतर प्रयोजनासाठी वर्षातील जास्तीत जास्त ४५ दिवस कार्यक्रम आयोजित करता येऊ शकतील. त्यासाठी निश्चित केलेले सुधारित परवानगी शुल्क शासनाकडून घेण्यात येणार आहे. जिमखान्यांमध्ये आयोजित कार्यक्रमांसाठी विशिष्ट केटरर्स अथवा डेकोरेटर्सची सक्ती करता येणार नाही. प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार जिमखान्यांना एकूण मंजूर बांधकामाच्या क्षेत्रफळाच्या १५ टक्केच्या मर्यादेत वाणिज्यिक वापर शासनाच्या परवानगीने करता येईल.

-----०-----

## प्रादेशिक योजनांमधील अकृषिक जमिनींचे व्यवहार दंड आकारून नियमित करण्यासाठी सुधारणा

प्रादेशिक योजनांमधील निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा अन्य बिगर शेती वापरासाठी असलेल्या जमिनींसंदर्भात पूर्वी झालेले बेकायदेशीर व्यवहार दंड आकारून नियमित करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यात शेतजमिनीतून कृषी उत्पादन वाढीच्या अनुषंगाने महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम २०१५ मंजूर करण्यात आला आहे. त्यात जमिनीच्या प्रकारानुसार शेतजमिनीचे किमान प्रमाणभूत क्षेत्र ठरविणे, प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या शेतजमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व शेतजमिनींचे एकत्रीकरण करणे यांची कार्यपद्धत ठरविण्यात आली आहे. त्यामुळे या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत पद्धतीने १५ नोव्हेंबर १९६५ नंतर झालेले व्यवहार सध्या नियमित करता येत नसल्यामुळे आजचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या अधिनियमामधील कलम ९ च्या पोटकलम (३) खाली नवीन परंतुक टाकण्यात येणार आहे. या परंतुकानुसार दंड म्हणून प्रचलित बाजारमुल्याच्या (शीघ्र सिद्ध गणक मूल्य) कमाल २५ टक्केच्या मर्यादेत शासन राजपत्राद्वारे वेळोवेळी निश्चित करेल अशा दराने अधिमूल्य आकारणी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे खऱ्याखुऱ्या (बोनाफाईड) अकृषिक वापराच्या जमिनींसंदर्भात नियमित करण्यात आलेल्या व्यवहाराच्या दिनांकापासून पाच वर्षात जमिनीचा नियोजित अकृषिक वापर सुरु न केल्यास ही जमीन जिल्हाधिकारी जप्त करतील. या जमिनीच्या प्रचलित बाजारमुल्याच्या ५० टक्के मूल्य आकारुन ती लगतच्या धारकास देण्यात येईल. त्यातून मिळालेल्या रकमेपैकी तीन चतुर्थांश रक्कम कसूरदार धारकास देऊन उर्वरित एक चतुर्थांश रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात येईल. मात्र, लगतचे धारक ही जमीन घेण्यास इच्छूक नसल्यास तिचा लिलाव करुन प्राप्त होणारी रक्कम कसूरदार धारक व शासन यामध्ये ३:१ या प्रमाणात विभागून देण्यात येईल.

शेतजमिनींची लागवड क्षमता कमी करणारी हस्तांतरणे किंवा वाटण्या प्रतिबंधित करण्यासाठी या अधिनियमात तुकडेबंदीविषयक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यांचे कटाक्षाने पालन करण्यात येत आहे. मात्र, अंतिम किंवा प्रारुप विकास आराखड्यात निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा अन्य अकृषिक वापरासाठी दर्शविण्यात आलेल्या जमिनींच्या बाबतीत या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत पद्धतीने शेतजमिनींच्या तुकड्यांच्या हस्तांतरणाचे व्यवहार झालेले आहेत. अधिनियमातील प्रतिबंधामुळे व्यवहारांस कायद्याची मान्यता नसल्याने त्यांची नोंद अधिकार अभिलेखात घेता आलेली नाही. त्यामुळे शासनास नोंदणी आणि मुद्रांक शुल्कापासून मिळणाऱ्या महसुलाचे नुकसान होते. त्याचप्रमाणे अशा जमिनींची निर्विवाद मालकी सिद्ध करणे कठीण असल्याने संबंधित प्राधिकरणांकडून आवश्यक त्या परवानग्या मिळत नाहीत. त्यामुळे या जमिनी प्रादेशिक योजनेतील नियोजित प्रयोजनासाठी देखील वापरात आणणे शक्य होत नाही. तसेच अधिकार अभिलेखातील नोंदी व प्रत्यक्ष कब्जेवहिवाट या परस्पराशी विसंगत राहतात. त्यामुळे अशा जमिनींसंदर्भात किंवा खऱ्याखुऱ्या अकृषिक प्रयोजनासाठी वापरात आणावयाच्या जमिनींसंदर्भात अधिनियमातील प्रतिबंध लागू करणे योग्य ठरत नाही. त्यामुळे पूर्वी झालेले व्यवहार दंड आकारून नियमित करण्याची तरतूद कायद्यात करण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----०-----

## नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या सामंजस्य करारासह पुणे मेट्रोच्या टप्पा एकच्या अंमलबजावणीस मंजुरी

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी राज्य शासन, केंद्र शासन आणि नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प यांच्या दरम्यान झालेल्या करारास कार्योत्तर मंजुरी आणि पुणे महानगर मेट्रोच्या अंमलबजावणीसाठी राज्य, केंद्र आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांच्यातील प्रस्तावित कराराच्या मसुद्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुणे आणि नागपूर शहरांतील सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधांत वाढ होण्यासाठी मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत असून त्याबाबतचे करार संबंधित संस्थांशी करण्यात येत आहेत. राज्य शासनाने ३० जानेवारी २०१४ च्या निर्णयानुसार नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाला मान्यता दिली होती. त्यानंतर केंद्र , राज्य, आणि नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला. त्यास आज मंजुरी देण्यात आली.

तसेच २३ डिसेंबर २०१६ च्या निर्णयानुसार पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्पास मंजुरी देण्यात आली असून केंद्र शासनाने कळविल्यानुसार केंद्र, राज्य आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांच्यातील त्रिपक्षीय कराराच्या मसुद्यास आज मंजुरी देण्यात आली. या कराराच्या अनुषंगाने येणारा खर्च महाराष्ट्र रेल कार्पोरेशन यांनी प्रकल्पाच्या अनुषंगाने स्थानिक, प्राधिकरण, शासकीय-निमशासकीय संस्था यांच्याकडील जमिनी घेऊन त्यांच्या विकासातून भागवायचा आहे. तसेच नागपूर व पुणे डीपीआरमध्ये दर्शविलेल्या बाबींशिवायच्या खर्चासाठी राज्य शासनाची मान्यता आवश्यक राहणार आहे. राज्य शासनावर वित्तीय भार वाढल्यास त्याची परिपूर्ती पुणे व नागपूर एसपीव्ही कंपनीकडील एस्क्रो खात्यातून करण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

## िभीमा साखर कारखान्याच्या कर्जास राज्य शासनाच्या हमीस मान्यता

पाटस (ता. दौंड, जि.पुणे) येथील भीमा सहकारी साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून ३५ कोटी ९० लाख रुपयांचे कर्ज घेण्यासाठी राज्य शासनाची हमी देण्याच्या प्रस्तावास विशेष बाब म्हणून आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

भीमा सहकारी साखर कारखान्याने राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या मार्जिन मनी योजनेंतर्गत ३५ कोटी ९० लाख रुपयांचे कर्ज मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. कारखाना हंगाम २०१७-१८ स्व-जबाबदारीने पार पाडणार असल्याने त्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊसाचे गाळप वेळेत होऊ शकणार आहे. परिणामी शेतकरी सभासदांचे आर्थिक नुकसान होणार नाही. तसेच कामगार वर्गास रोजगार उपलब्ध होणार आहे. हे लक्षात घेऊन कारखान्याच्या कर्जास काही अटी व शर्तींच्या अधीन राहून विशेष बाब म्हणून हमी देण्यास मान्यता देण्यात आली आहे. कारखान्याच्या २०१७-१८ च्या गाळप हंगामापासून मिळणाऱ्या उत्पन्नातून प्राथम्याने कर्जाचा वार्षिक हप्ता वसूल करण्याची कार्यवाही साखर आयुक्तांमार्फत करण्यात येणार आहे. या कर्जाची परतफेड पाच समान वार्षिक हप्त्यात करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच साखर आयुक्तांमार्फत कारखान्याच्या संचालकांची वैयक्तिक मालमत्ता तारण करुन घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भीमा सहकारी साखर कारखान्याच्या कर्जास हमी देण्याचा निर्णय इतर प्रकरणांसाठी पूर्वोदाहरण म्हणून वापरता येणार नाही.

-----o-----